# प्रा स्ता वि क

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरए. 1066 - डी. I., दिनांक 1 एप्रिल 1968 अन्वये पंचायती राज संस्थांच्या लेख्यांच्या परिक्षणाबाबत संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचा हा सेहेचाळीसावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल आहे. राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण पुर्ण झाले असून, त्यांचे लेखापरीक्षा अहवालही निर्गमित झालेले आहेत. त्या लेखापरीक्षा अहवालातील काही महत्त्वाच्या बाबींवरील अभिप्राय या पुनर्विलोकन अहवालात अंतर्भूत केलेले आहेत.

लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये अंतर्भूत केलेल्या प्रत्येक परिच्छेदात संदर्भित जिल्हा परिषदेच्या अथवा पंचायत समित्यांच्या नावांचा उल्लेख केला असून, लेखापरीक्षा अहवालातील मूळ परिच्छेदांचे क्रमांक कंसामध्ये नमूद केले आहेत.

या अहवालात समाविष्ट केलेले परिच्छेद, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समितींच्या अधिकाऱ्यांना अनुपालनासाठी व अद्यावत माहिती देण्यासाठी कळविण्यात आलेले होते व त्यांची पूर्तता करण्यासाठी जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांना आवश्यक तो कालावधी देण्यात आला होता. जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी दिलेली उत्तरे विचारात घेऊन परिच्छेदांचे अंतिमीकरण करण्यात आले आहे.

अहवाल वाचन सुलभ होण्यासाठी अहवालाच्या शेवटी जिल्हा परिषदवार परिच्छेदांची निर्देश सूची देण्यात आली आहे.

**( प्रताप मोहिते )**

संचालक,

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,

महाराष्ट्र राज्य.